मागणी क्रमांक आर-१, लेखाशिर्ष "२२१०३०६५" अंतर्गत अनुशेषांर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रें बांधकामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निधी मंजुर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१७/प्र.क्र.१८७/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ११ ऑक्टोंबर, २०१७.

वाचा :

१) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.**
२) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.**
३) **आरोग्य सेवा संचालनालय, पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-७अ/टे-८/प्रादेशिक अनुशेष सन २०१७१८प्रस्ताव/६८५९६०/२०१७, दिनांक ०५.८.२०१७.**
४) **शासन समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक १५.९.२०१७.**

प्रस्तावना :

राज्यातील प्रादेशिक अनुशेष दूर करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी आवश्यक निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधी होती. याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक-४ येथील शासन निर्णयान्वये उपलब्ध निधीच्या ८० टक्के निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकानुसार ७० टक्के निधी वितरीत करणे आवश्यक असल्याने सदर शासन निर्णय रद्द करण्यात येत असून ७० टक्के निधी पुढील प्रमाणे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर्भ क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये "महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७" (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१७ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह) यास महाराष्ट्र विधानमंडळाने मंजूरी दिली असून, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे आणि ते २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ म्हणून महाराष्ट्र राजपत्र

असाधारण भाग-४, दिनांक १५.४.२०१५ अन्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत निधीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	जिल्हा	संचालनालयाने मागणी केलेला एकूण निधी	मंजूर निधीच्या ७० टक्केनुसार वितरीत निधी
१	सातारा	१६००.००	१३११.५२
२	जळगाव	६२२.००	५०९.८५
३	कोल्हापूर	७००.००	५७३.७९
४	सोलापूर	११.५९	९.५०
५	नांदेड	१८२.००	१४९.१९
६	परभणी	१५७०.६०	११८७.४२
७	जालना	४०१.००	३२८.७०
	एकूण	**५०८७.१९**	**४०६९.९७**

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ८००- इतर खर्च, प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरीता योजना- स्थानिक क्षेत्रातील योजना (राज्य योजना), (०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत योजनांकरिता अनुदान (२२१० ३०६५), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" याखालील सन २०१७-१८ करिता उपलब्ध असलेल्या निधीमधून खर्ची टाकण्यात यावे.

४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना असे कळविण्यात येते की, उपरोक्त ७ जिल्ह्यांसाठी मंजुर करण्यात आलेल्या निधीचे कामनिहाय वाटप करण्यात यावे व मंजुर करण्यात आलेला सदर निधी नियमानुसार खर्च करण्यात यावा व त्यापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं -२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३० जुन, २०१७. मान्यतेस अनसरुन निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१११११३९५०८२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.11 16:11:41 +05'30'

(रो.दि. कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. जिल्हा कोषागार अधिकारी. (सातारा/जळगाव/कोल्हापूर/सोलापूर/नांदेड/परभणी /जालना)
४. सह संचालक, रुग्णालये (जिल्हास्तर), आरोग्य सेवा, मुंबई.
५. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी (सातारा/जळगाव/कोल्हापूर/सोलापूर/नांदेड/परभणी /जालना)
७. नियंत्रक, लेखा व लेखापरीक्षा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
८. वित्त विभाग (अर्थसं ३), मंत्रालय, मुंबई.
९. सार्वजनिक आरोग्य विभाग (कार्यासन- अर्थसंकल्प/ आरोग्य ३-अ, आरोग्य ४), मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (आरोग्य ३).